43

जा.क्र.मसंके / कंदपिके/५१ /     /२०२३
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली
ता. दापोली, ज़ि. रत्नागिरी
दिनांक. 20 APR 2023

प्रति,

मा. व्यवस्थापक
कृषिज्ञान व्यवस्थापन कक्ष
डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ,
दापोली, जि. रत्नागिरी.

विषय : विद्यापीठ संकेतस्थळावर अखिल भारतीय समन्वित कंदपिके संशोधन योजना प्रक्षेत्रावरील ठेका पद्धतीने कामे करण्याचे दरपत्रक प्रसिद्धी देणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयांन्वये आपणास कळविण्यात येते की, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली,अंतर्गत अ.भा. स. कंदपिके संशोधन योजना, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली, ता. दापोली जि. रत्नागिरी या योजनेकरिता प्रक्षेत्रावरील ठेका पद्धतीने कामे करण्या बाबतची प्रसिद्धी विद्यापीठ संकेतस्थळावर ( www.dbskkv.org ) करणेस विनंती आहे. सोबत प्रसिद्धी नमुना जोडण्यात येत आहे.

आपली विश्वासू,

सहाय्यक उद्यानविद्यावेत्ता
कंदपिके संशोधन योजना
म.स.कें,वाकवली

Scanned with OKEN Scanner

# डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली.
## मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली
## ता. दापोली, जि. रत्नागिरी

जा.क्र.म.स.के./कंदपिके /ठेका/ ५१ /२०२३ दि. 20 APR 2023

**<u>जाहीर नोटीस</u>**

मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली अंतर्गत अखिल भारतीय समन्वित कंदपिके संशोधन योजना प्रक्षेत्रावरील कामे ठेका पद्धतीने करावयाची आहेत. त्या कामाचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | करावयाच्या कामाचा तपशील | क्षेत्र | कालावधी | आवश्यक मनुष्यबळ |
|---|---|---|---|---|
| १) | कणगर आणि सुरण लागवडीसाठी २ x २ फुट आकाराचे व ९० फुट लांबीचे एकुण-२ प्लॉट मध्ये चर मारून त्यामध्ये शेणखत , पालापाचोळा, भाताचा कोंडा टाकून चर बुजविणे व त्यावर ७५ x ७५ आकाराची सरी करणे. कणगर, करांदा, घोरकंद आधार देण्यासाठी खुंटया काढणे | | १५/ ५/२३ ते २५/ ५/२३ | १७० |
| २) | कणगर, करांदा, घोरकंद, सुरण, वडीचा अळू, भाजीचा अळू, मिश्रिकंद, अरारूट, शेवरकंद, रताळी कंदपिक लागवडीसाठी<br>६० x ६०,७५ x ७५,९० x ९० आकाराच्या व ९० फुट लांबीच्या एकुण -१२ प्लॉट मध्ये सऱ्या करणे. प्लॉट क्रमांक १ ते १४ मध्ये पावसाचे पाणी साचून कंद कुजू नयेत यासाठी प्लॉट मधून साचलेले पाणी बाहेर काढण्यासाठी २x२ फुट आकाराचे चर मारणे. | २ हेक्टर | २६/ ५/२३ ते १०/६/२३ | २०५ |
| ३) | कणगर, करांदा, घोरकंद, सुरण, वडीचा अळू, भाजीचा अळू, मिश्रिकंद, अरारूट, शेवरकंद, रताळी,कणगर ,सुरण कंदपिक लागवडीसाठी सऱ्यांवर खड्डे मारणे ,शेणखत बारीक करून टाकणे व कंद पिकांची लागवड करणे.,बांबू लावणे, जी आय तार लावणे व वेलीना प्लास्टीक सुतळ लावून वेली वर चढविणे. | | १५/६/२३ ते ३१/७/२३ | ५४१ |
| ४) | कणगर, करांदा, घोरकंद, सुरण, वडीचा अळू, भाजीचा अळू, मिश्रिकंद, अरारूट, शेवरकंद, रताळी,कणगर ,सुरण कंदपिकातील तण काढणे. | | १/८/२३ ते १५/८/२३ | २०४ |

Scanned with OKEN Scanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५) | कणगर, करांदा, घोरकंद, सुरण, वडीचा अळू, भाजीचा अळू, मिश्रिकंद, अरारूट, शेवरकंद, रताळी,कणगर ,सुरण कंदपिकास रिंगा करून खते देऊन टिकावाने खोदकाम करून फावड्याने मातीची भर देणे. | | १६/८/२३ ते ३०/८/२३ | २०४ |
| ६) | कंदपिकांच्या वेली वळविणे व कणगर, करांदा, घोरकंद, सुरण, वडीचा अळू, भाजीचा अळू, मिश्रिकंद, अरारूट, शेवरकंद, रताळी,कणगर, सुरण कंदपिकातील तण काढणे. तसेच सर्व कंदपिकांना ह्युमिक ॲसिडचे ड्रेंचिंग करणे. | | १/१०/२३ ते १५/१०/२३ | २०४ |
| | | | एकूण | १५२८ |

तरी वरील प्रमाणे कामे ठेका पद्धतीने एकूण १५२८ मजूर युनिट च्या सहाय्याने दि.१५/०५/२०२३ ते १५/१०/२०२३ या कालावधी मध्ये करावयाची आहेत. तरी इच्छुक ठेकेदारांनी आपले दरपत्रक दि. २/५/२०२३ पर्यंत बंद लिफाफ्यात भरून या कार्यालयास पोहोचेल असे पाठवावे.

**<u>ठेकेदारास खालीलप्रमाणे कामाच्या अटी व शर्थी बंधनकारक राहतील</u>**

१) ठेकेदाराने ठेका सादर करण्यापूर्वी प्रत्यक्ष प्रक्षेत्रावर कामाचे स्वरुप पाहूनच दरपत्रकामध्ये/दरपत्रक/निविदेमध्ये दर सादर करावेत.

२) ठेका मंजूरी आदेश प्राप्त होताच मंजूरी पत्रामध्ये दिलेल्या दिनांकापासून निम्नस्वाक्षरीकार / विभाग प्रमुख/प्रक्षेत्र अधीक्षक यांनी दिलेल्या सूचनानुसार व त्यांचे देखरेखेखाली काम करावयाचे आहे .

३) ठेकेदाराने नेमलेल्या मजुरांना श्रम व रोजगार मंत्रालय नवी दिली यांचा F.NO. 1/13(1)/2017-LS-11 दिनांक - १७.३.२०१७ च्या अनुषंगाने शासनाच्या किमान वेतन दरानुसार वेतन देण्यात येते, असे प्रमाणपत्र ठेक्याचे देयक कार्यालयास सादर करतेवेळी देयकासोबत सादर करणे आवश्यक आहे. प्रमाणपत्र देयकासोबत नसल्यास देयकाची अदायगीकरण्यात येणार नाही .

४) कामाच्या मजुरीची अदायगी काम पूर्ण झाल्यावर अथवा महिना पूर्ण झाल्यावर करण्यात येईल. संबंधित देयक सादर करताना विभाग प्रमुख /प्रक्षेत्र प्रमुख /प्रक्षेत्र अधीक्षक यांचेकडील कामे वेळेत पूर्ण केलेबाबतचा दाखला देयकासोबत जोडणे बंधनकारक राहील.

५) ठेका अपूर्ण सोडल्यास ठेक्याच्या देयकाची अदायगी केली जाणार नाही व सदर कामाचा अनुभव पुढील ठेक्याच्यावेळी गृहीत धरला जाणार नाही. तसेच संबंधित ठेकेदाराचे दरपत्रक/निविदा पुढील ठेक्याच्या वेळी ग्राह्य धरले जाणार नाही.

कृ/पुढे/पान

Scanned with OKEN Scanner

६) प्रक्षेत्रावर दिलेल्या सूचनेनुसार करावयाची कामे विभागाच्या सोयी व गरजेनुसार ठेकेदाराने करणे बंधनकारक असेल, सूचनांचा अवमान केल्यास ठेका त्वरीत बंद केला जाईल आणि त्याबाबत ठेकेदाराच्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

७) ठेकेदाराकडे पॅन कार्ड, आधारकार्ड व बँक खाती तपशिल ( छायांकित प्रत) सोबत जोडणे बंधनकारक आहे. ठेकेदाराच्या देयकाची अदायागी त्याचे बँक खाती N.E.F.T./R.T.G.S. करण्यात येईल.

८) ठेकेदाराने कामावर ठेवलेल्या कामगारांना अपघात /सर्पदंश/विंचूदंश झाल्याश संबंधित कामगारांवर योग्य ते उपचार करण्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील. त्यासाठी आलेल्या खर्चाची अदायगी या कार्यालयाद्वारे करण्यात येणार नाही. प्रक्षेत्र/ कार्यालय काम करतेवेळी काही अपघात /इजा झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही आणि कोणतेही विमा कवच व प्रतिपूर्ती असणार नाही.

९) कामाच्या कालावधीत ठेकेदार अथवा त्याच्या कामगाराकडून / मजुरांकडून प्रक्षेत्राच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास ठेकेदाच्या देयकामधून संबंधित नुकसानीची किंमत वसूल करण्यात येईल आणि त्याबाबत ठेकेदारावर कायदेशीर कार्यवाही करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना असेल.

१०) ठेकेदारामार्फत पुरविण्यात आलेल्या सेवासुविधा तसेच त्याच्या कार्यपद्धतीचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यात येईल. कार्यालयाने दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यास ठेकेदारास बंधनकारक आहे. सदरचे काम करत असताना प्रक्षेत्र आणि कार्यालय दोन्हीही ठिकाणचे कार्यालयीन शिष्टाचार पाळणे बंधनकारक आहे. तसे न केल्यास ठेकेदारास देण्यात आलेल्या ठेका कोणत्याही वेळी रद्द करण्याचा निम्नस्वाक्षरीकार अधिकार यांनी राखून ठेवला आहे.

११) सर्वोच्च न्यायालयाने निर्धारित केलेल्या याचिका क्रमांक SLP-5443/90 नुसार ठेकेदारास किंवा ठेकेदाराने नेमलेल्या मजुरास /इसमास ठेका कालावधीमध्ये /ठेका कालावधी नंतर विद्यापीठ /शासकीय सेवेत कायम स्वरूपी नोकरी मिळण्यास अधिकार राहणार नाही व तसा दाखला देण्यात येणार नाही .

१२) ज्या कंपनीस / संस्थेस / व्यक्तीस ठेका देण्यात येईल त्यांनी उपरोक्त अटी व शर्ती मान्य असले बाबतचा करार लिखित स्वरुपात करणे बंधनकारक राहील. कंपनी / संस्थेतर्फे / ठेकेदारामार्फत कामावर ठेवलेल्या कर्मचाऱ्यांच्या ठेवलेले कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किवा विद्यापीठावर असणार नाही.

१३) शासन निर्णयानुसार पद्धतीप्रमाणे ठेकेदाराचे देयकातून आयकर कपात करणेत येईल.

कृ|भा| प्रमुख

मागील कामाबाबतची प्रत्यक्ष माहिती मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली, ता. दापोली जि. रत्नागिरी यांचे कार्यालयास सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत मिळेल.

सहाय्यक उद्यानविद्यावेत्ता
म.स.कें. वाकवली
ता. दापोली, जि. रत्नागिरी

प्रत, माहितीसाठी सादर

१) नोटीस बोर्ड मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली
२) नोटीस बोर्ड भासुयो /कंदपिके योजना /वाकवली विभाग, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली,

Scanned with OKEN Scanner